मुक्ताई दूत
प्रतिनिधी नेमणे आहे
दै. मुक्ताई दूत साठी जळगाव जिल्ह्यासह महाराष्ट्रातील सर्व जिल्हे व
तालुक्यांसाठी वार्ताहर / प्रतिनिधी नेमणे आहे :
फैजपूर, रावेर, अमळनेर, एरंडोल, धरणगाव, पाचोरा, जामनेर, बोदवड, वरणगाव, चाळीसगाव, कासोदा, अडावद, सावदा, पहूर, यावल, पाळधी, जळगाव शहर, भुसावळ, चोपडा, मुक्ताईनगर, भडगाव, पारोळा, नशिराबाद, शिंदखेडा इत्यादींसह जळगाव जिल्ह्यातील सर्व तालुके, शहरे आणि मोठ्या गावांमध्ये तसेच महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्हे आणि महत्वाच्या तालुक्यांमध्ये प्रतिनिधींची तातडीने आवश्यकता आहे.
पत्ता: २७० भोईवाडा, शिवरायनगर, मुक्ताईनगर, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव
संपर्क: ९९७०६०९३९२, ९९५८५८८८२९, ८८८८०९२७९७, ९८५०२५१५५५
मुक्ताई दूत... जनतेचा विश्वास! सत्याची आस... बातमी आमची, साथ तुमची!

# मुक्ताई दूत

RNI-MHMAR/26/A1057

**-: आपलं अध्यात्म :-**

स्वप्नींची आत्मा केउता आहे ।
मागुता ये हैं नवल काई ॥१॥
चांगा म्हणे आहे सांग मुक्ताबाई
लटिकें साथ वर्ततें देहीं ॥२॥
मुक्ताई म्हणे चांगया मिस्त ।
देहीं निर्धारीं राही स्वप्न कैचें ॥३॥

E-Paper.muktaidoot.com | जळगाव । रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ | वर्ष १ । अंक १०३ | किंमत : २ रु. | पाने ४

# स्क्रॅप रिक्षांविरोधात ५ ऑक्टोबरपर्यंत धडक कारवाई

## प्रवाशांच्या सुरक्षेला धोका ठरणाऱ्या नियमबाह्य रिक्षांवर कठोर कारवाई; परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांचे आरटीओला स्पष्ट निर्देश

**मुंबई : स्क्रॅप घोषित झाल्यानंतरही रस्त्यावर धावणाऱ्या आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षांविरोधात आता राज्यभर धडक कारवाई करण्यात येणार आहे. अशा रिक्षांमुळे प्रवाशांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण होत असल्याने ५ ऑक्टोबरपर्यंत विशेष तपासणी मोहीम राबवून नियमबाह्य रिक्षांवर कठोर कारवाई करा, असे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार वाहन परिवहन विभागाला दिले.**






स्क्रॅप झालेल्या रिक्षांचा पुन्हा प्रवासी वाहतुकीसाठी वापर होत असल्याच्या तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे अशा वाहनांची नोंदणी केली जात असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर सरनाईक यांनी शुक्रवारी परिवहन विभागाची विशेष बैठक घेतली.

'प्रवाशांची सुरक्षितता ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. नियमबाह्य आणि धोकादायक वाहनांमधून प्रवासी वाहतूक करण्यास कोणतीही मुभा दिली जाणार नाही,' असे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

### स्क्रॅप रिक्षांची विशेष तपासणी

स्क्रॅप घोषित झालेल्या रिक्षांचा पुन्हा वापर होत आहे का, बनावट कागदपत्रांच्या आधारे त्यांची नोंदणी झाली आहे का, तसेच नियमांचे उल्लंघन करून प्रवासी वाहतूक केली जात आहे का, याची विशेष तपासणी करण्यात येणार आहे. दोषी आढळलेल्या वाहनांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यासोबतच आवश्यक ती कठोर पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी आपल्या कार्यक्षेत्रात विशेष तपासणी मोहीम प्रभावीपणे राबवावी. ५ ऑक्टोबरपर्यंत करण्यात आलेल्या कारवाईचा सविस्तर आढावा सादर करावा, असेही मंत्री सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना बजावले.

### सुरक्षित वाहनांनाच परवानगी

रिक्षा-टॅक्सी चालक आणि त्यांच्या संघटनांनीही प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले. काही नियमबाह्य वाहनांमुळे संपूर्ण रिक्षा व्यवसायाची प्रतिमा खराब होऊ नये, यासाठी केवळ अधिकृत आणि सुरक्षित वाहनांनाच प्रवासी वाहतुकीची परवानगी असावी, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली.

### परिवहन आयुक्त कार्यालयात बैठक

परिवहन आयुक्त कार्यालयात झालेल्या या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, रिक्षा-टॅक्सी युनियनचे नेते शशांक राव यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या मोहिमेत आरटीओ पथकांनी नियमबाह्य रिक्षांवर विशेष लक्ष केंद्रित करून कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# शिक्षणमंत्र्यांचे अधिकार अधिकारी स्तरावर; दादा भुसेंची पहिली प्रतिक्रिया

## स्वयंअर्थसहाय्यित शाळांबाबतचे महत्त्वाचे निर्णय सचिव, शिक्षण आयुक्तांकडे

**मुंबई** : स्वयंअर्थसहाय्यित शाळांशी संबंधित महत्त्वाचे निर्णय आता शालेय शिक्षणमंत्र्यांच्या स्तरावर न घेता विभागाचे सचिव आणि शिक्षण आयुक्त घेणार आहेत. अतिरिक्त तुकड्या व शाखांना मान्यता, नव्या शाखांना परवानगी तसेच सीबीएसई, आयसीएसईसह विविध शिक्षण मंडळांच्या अभ्यासक्रमांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार अधिकारी स्तरावर सोपविण्यात आले आहेत.

मंत्र्यांच्या अधिकारांना कात्री लावल्याची चर्चा सुरू असताना, हा निर्णय आपणच घेतल्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले. मंत्रालयातील कामांची गर्दी कमी करून निर्णय प्रक्रियेत सुटसुटीतपणा आणि गतिमानता यावी, यासाठी अधिकारांचे विकेंद्रीकरण केल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्येक प्रस्ताव मंत्र्यांच्या स्तरावर येऊ नये आणि निर्णय लवकर व्हावेत, यासाठी संबंधित अधिकार सचिव व शिक्षण आयुक्तांकडे देण्यात आल्याचे भुसे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शिक्षक दिनीच जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी कोल्हापुरात हजारो शिक्षकांनी मोर्चा काढला. दसरा चौकातून सुरू झालेला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. हातात विविध मागण्यांचे फलक आणि तोंडाला काळे मास्क लावून शिक्षक सहभागी झाले. शिक्षकांसोबत संस्थाचालकांचाही सहभाग होता.

# किरण प्रकाश झरकर यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान

- छत्रपती संभाजीनगर विभागातील आयटीआय क्षेत्राला प्रथमच राष्ट्रीय सन्मान
- मुळचे ईट येथील स्वातंत्र्यसेनानी देविदास माधव झरकर यांचे किरण झरकर नातू



**नवी दिल्ली** : स्वातंत्र्यसेनानी देविदास माधव झरकर यांच्या राष्ट्रभक्तीचा वारसा पुढे नेत व्यवसाय शिक्षण, कौशल्य विकास, विद्यार्थीहित, संशोधन आणि सामाजिक कार्यात उल्लेखनीय योगदान देणारे भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिवचे शिल्पनिदेशक डॉ. किरण प्रकाश झरकर यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री जयंत चौधरी, शिक्षण राज्यमंत्री सुकांत मजूमदार तसेच शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण पूर्ण करून १७ वर्षांच्या सेवेत विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या किरण झरकर यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली. आयटीआय प्रशिक्षणार्थ्यांच्या शैक्षणिक व आर्थिक प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळावे यासाठी त्यांनी व्यापक जनसमर्थन उभे केले. तब्बल २५० ग्रामपंचायतींचे ठराव आणि १० हजार नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांद्वारे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.

'व्यवसाय प्रशिक्षण परियोजना'च्या माध्यमातून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या कार्याची दखल घेत विधानसभा आणि विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित झाले. या कार्यात आमदार संजय केनेकर आणि आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचे सहकार्य लाभले.

झरकर यांच्या कार्यातील महत्त्वाचा उपक्रम म्हणजे 'स्किलबुक' ही संगणक प्रणाली. हा प्रकल्प साकारण्यासाठी त्यांच्या पत्नी स्मिता झरकर यांनी स्वतःचे दागिने विकून निधी उभा केला. पुढे ज्येष्ठ समाजसेवक रमेश अण्णा मुळे यांनी मदतीचा हात पुढे केला. नवी दिल्ली येथे शंकराचार्य स्वामी निश्चलानंद सरस्वती यांच्या हस्ते या संगणक प्रणालीचे लोकार्पण झाले.

किरण झरकर हे 'वंदे मातृशक्ती' या पुस्तकाचे लेखक आहेत. राष्ट्रनिर्मितीत मातांच्या योगदानाचा गौरव करणाऱ्या या पुस्तकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री स्वर्गीय हिराबेन मोदी यांचा तसेच झरकर यांच्या मातोश्री शैला झरकर यांचा जीवनप्रवास मांडण्यात आला आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती ज्ञानसुधा मिश्रा आणि खासदार बासुरी स्वराज यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले.


किरण झरकर हे थोर स्वातंत्र्यसेनानी देविदास माधव झरकर यांचे नातू आहेत. देविदास झरकर यांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेत 'वंदे मातरम्' आणि 'जन गण मन'च्या माध्यमातून जनजागृती केली. विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीतही त्यांनी योगदान दिले. झरकर कुटुंबातील स्वर्गीय थोर स्वातंत्र्यसेनानी अँड. राजाभाऊ झरकर यांनीही राष्ट्रकार्य आणि सामाजिक क्षेत्रात योगदान दिले.

किरण झरकर यांच्या नावावर एक पेटंट, एक ट्रेडमार्क, १६ पुस्तके आणि तीन संशोधन प्रबंध आहेत. आयटीआय व कौशल्य विकास क्षेत्रावर त्यांनी शेकडो गाणी व लेखन केले आहे.

सामाजिक क्षेत्रातही ते रमेश अण्णा मुळे फाउंडेशन (छत्रपती संभाजीनगर), तेरणा यूथ फाउंडेशन (धाराशिव), श्री गणेश सेवा मंडळ (नवी दिल्ली) आणि रूपमाता फाउंडेशन (धाराशिव) यांच्या माध्यमातून कार्यरत आहेत.

त्यांच्या कार्यासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप खेडकर, महामंत्री डॉ. दिलीप अर्जुने, प्रा. डॉ. वैभव नरवडे आणि ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. डॉ. शेखर चंद्रात्रे यांचे आशीर्वाद लाभले. तसेच प्रधान सचिव मनीषा वर्मा, संचालक सतीश सूर्यवंशी, सहसंचालक प्रदीप दुर्गे आणि प्राचार्य मारुती बिरादार यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'मग फडणवीस-भाजपने काय केलं?'; विखेंच्या सवालावर जरांगेंचा पलटवार



**जालना** : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे सुरू असलेले आमरण उपोषण आठव्या दिवशीही कायम आहे. सरकारने दिलेला शब्द पाळला नसल्याचा आरोप करत जरांगे यांनी पुन्हा पाणी आणि औषधोपचार घेणे बंद केले आहे.

दोन दिवसांपूर्वी सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगे यांची भेट घेत मागण्यांवर प्रयत्न सुरू असल्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर त्यांनी पाणी आणि औषधे घेण्यास सुरुवात केली. मात्र, तीन दिवस उलटूनही ठोस निर्णय न झाल्याने त्यांनी पुन्हा आक्रमक भूमिका घेतली.

### विखेंच्या सवालावर पलटवार

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी 'शरद पवारांनी काय केले? महाविकास आघाडीने काय केले?' असा सवाल केल्याचा उल्लेख करत जरांगे यांनी "मग फडणवीस आणि भाजप सरकारने तरी काय केले?" असा प्रतिप्रश्न केला. "मराठ्यांनी तुम्हाला भरघोस मतांनी निवडून दिले. मराठ्यांचे भले करण्यासाठीच सत्ता दिली," असेही त्यांनी सुनावले.

मराठ्यांना आरक्षण दिले आणि प्रमाणपत्रे रद्दही तुम्हीच केली, असा आरोप करत सातारा व कोल्हापूर गॅझेटनुसार प्रमाणपत्र देण्याबाबत अद्याप शासन निर्णय झालेला नसल्याचे त्यांनी म्हटले.

### 'काठी लावून दाखवा, ताकद दाखवतो'

आंदोलन शांततेच्या मार्गाने सुरू असल्याचे सांगत जरांगे यांनी सरकारला इशारा दिला. "माझ्या मराठ्यांच्या पोरांना काठी लावून दाखवा, मग मराठ्यांची ताकद दाखवतो," असा इशारा त्यांनी दिला.

"तुमच्या शब्दावर विश्वास ठेवून पाणी, औषधे आणि सलाईन घेतले. शब्द पाळला नाही, त्यामुळे रात्री ११ वाजल्यापासून पुन्हा पाणी व औषधोपचार बंद केले," असे जरांगे यांनी स्पष्ट केले. सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# पुण्यात दहीहंडी उत्सवात पहिला गुन्हा; नियम मोडून डीजे वाजवणे भोवले!




**पुणे** : दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनी प्रदूषणाबाबत पोलिसांनी घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बिबवेवाडी येथील श्रीकृष्ण तरुण मंडळावर पुणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. परवानगी असलेल्या ४ बेस व ४ टॉप स्पीकरऐवजी तब्बल ८ बेस आणि ८ टॉप स्पीकर लावून ध्वनी प्रदूषण केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी संबंधित साऊंड सिस्टिमही जप्त केली आहे. यंदाच्या दहीहंडी उत्सवातील पहिली कारवाई असल्याची माहिती आहे.

पुणे शहरात दहीहंडी उत्सवासाठी पोलिसांनी ध्वनी प्रदूषणाबाबत कडक नियम लागू केले आहेत. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी लाऊडस्पीकरसाठी ४ बेस आणि ४ टॉप स्पीकरचीच परवानगी राहणार असल्याचे स्पष्ट केले होते. निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक साऊंड सिस्टिमचा वापर करून ध्वनी प्रदूषण केल्यास कारवाईचा इशाराही देण्यात आला होता. मात्र, बिबवेवाडी ओटा परिसरातील श्रीकृष्ण तरुण मंडळाने दहीहंडी कार्यक्रमासाठी घेतलेल्या परवानगीतील अटींचे उल्लंघन केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. मंडळाने पारंपरिक वाद्य वापरण्याबाबत परवाना घेतला असतानाही ८ बेस व ८ टॉप स्पीकर लावून मोठ्या आवाजात ध्वनीक्षेपण केल्याचे आढळून आले.

ध्वनीक्षेपकासाठी निश्चित केलेल्या मर्यादेच्या दुप्पट साऊंड सिस्टिमचा वापर केल्याने परिसरात ध्वनी प्रदूषण निर्माण झाले. त्यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली. या प्रकरणी मंडळाचे अध्यक्ष राहुल प्रकाश जगताप यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, वापरण्यात आलेली साऊंड सिस्टिम पोलिसांनी जप्त केली आहे. दहीहंडी उत्सवात गोविंदांचा उत्साह शिगेला पोहोचलेला असतानाच पुणे पोलिसांनी ध्वनी प्रदूषणाच्या नियमांबाबत कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. उत्सवाचा उत्साह कायम ठेवताना नियमांचे उल्लंघन केल्यास कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

# खरगोन–सुलतानपूर फाटा मार्ग काटेरी झुडपांच्या विळख्यात!

## रस्त्याची रुंदी झाली कमी; समोरून वाहन आल्यास चालकांची कसरत, अपघाताचा धोका वाढला

**शहादा** : तालुक्यातील खरगोन ते सुलतानपूर फाटा हा महत्त्वाचा मार्ग सध्या काटेरी झुडपांच्या विळख्यात अडकला असून, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढलेल्या झुडपांमुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्याच्या देखभाल-दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

खरगोन–सुलतानपूर फाटा या मार्गावरून सुलतानपूर, सुलवाडा, मुबारकपूर, बहिरपूर, आडगाव आणि खगोन या गावांतील नागरिकांची दररोज मोठ्या प्रमाणात ये-जा असते. विद्यार्थी, शेतकरी, कामगार तसेच नोकरदारांसाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात काटेरी झुडपे वाढल्याने रस्त्याची रुंदी कमी झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.

### समोरून वाहन आल्यास चालकांची कसरत

रस्त्याच्या कडेला वाढलेल्या झुडपांमुळे समोरून येणाऱ्या वाहनांना बाजू देताना वाहनचालकांची मोठी कसरत होते. विशेषतः दुचाकीस्वारांना या झुडपांचा मोठा फटका बसत आहे. झुडपांच्या फांद्या रस्त्यावर आल्याने वाहनधारकांना इजा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रात्रीच्या वेळी ही समस्या आणखी गंभीर होत असून, अपघाताचा धोका वाढला आहे.

### पावसाळ्यात समस्या अधिक गंभीर



सध्या पावसाळ्यामुळे झुडपांची वाढ मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामुळे रस्त्याची दृश्यमानता कमी झाली असून, वळणांवर समोरून येणारे वाहन वेळेत दिसत नसल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच सार्वजनिक बांधकाम विभाग जागा होणार का ? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### वारंवार तक्रारी करूनही कारवाई नाही

रस्त्याच्या दोन्ही बाजूंची साफसफाई करून काटेरी झुडपे तातडीने हटवावीत, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात आली आहे. याबाबत संबंधित सार्वजनिक बांधकाम उपविभागाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### सहा गावांसाठी महत्त्वाचा मार्ग

खरगोन–सुलतानपूर फाटा मार्ग हा परिसरातील सहा गावांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. या मार्गावरून दररोज शेकडो नागरिक प्रवास करतात. रस्त्याची सुरक्षितता ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित बाब असताना संबंधित विभागाने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

### दुर्घटनेपूर्वी झुडपे हटविण्याची मागणी

मोठा अपघात होण्याची वाट न पाहता सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने रस्त्याच्या दोन्ही बाजूंची साफसफाई करून काटेरी झुडपे हटवावीत, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच नियमितपणे रस्त्याच्या कडांची पाहणी करून वाढणारी झुडपे वेळोवेळी हटविण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशीही मागणी होत आहे.

प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही तर भविष्यात या मार्गावर एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची? असा थेट सवाल आता परिसरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# सुरक्षिततेचा नवा आयाम: श्रीकांत धिवरे यांच्या नेतृत्वात जळगाव पोलिसांचा 'डायल 112' मधील ऐतिहासिकल्ला

संपादकीय

आजच्या वेगवान आणि गुंतागुंतीच्या युगात नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न केवळ कायदा आणि सुव्यवस्था राखण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर आपत्कालीन प्रसंगी किती वेगाने मदत पोहोचते, यावर प्रशासकीय कार्यक्षमतेची खरी कसोटी लागते. कुठल्याही संकटात सापडलेल्या नागरिकासाठी तो मदतीचा प्रत्येक क्षण अत्यंत महत्त्वाचा असतो. याच वास्तवाला ओळखून, महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'डायल ११२' या आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेने जळगाव जिल्ह्यात एक नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या खमक्या आणि दूरदर्शी नेतृत्त्वाखाली जळगाव जिल्हा पोलीस दलाने ऑगस्ट महिन्यात नाशिक परिक्षेत्रात सर्वच जिल्ह्यांमध्ये अव्वल स्थान पटकावत आपली कर्तव्यतत्परता सिद्ध केली आहे.

'डायल ११२' ही केवळ एक दूरध्वनी सेवा नसून ती नागरिकांच्या विश्वासाची आणि आशेची अंतिम किरण आहे. ऑगस्ट महिन्यात जळगाव जिल्ह्यात या यंत्रणेवर तब्बल ३,१६७ आपत्कालीन कॉल्स प्राप्त झाले. विशेष म्हणजे, या सर्व कॉल्सना जळगाव पोलिसांच्या प्रतिसाद पथकाने सरासरी अवघ्या ६ मिनिटे १८ सेकंदांत प्रत्युत्तर देत घटनास्थळी धाव घेतली. नाशिक परिक्षेत्रातील इतर जिल्ह्यांचा विचार केला तर, नाशिक ग्रामीण येथे ४,३२५ कॉल्ससाठी ६ मिनिटे २७ सेकंद, नंदुरबार येथे ५१६ कॉल्ससाठी ६ मिनिटे ४५ सेकंद, अहिल्यानगर येथे ७,३८३ कॉल्ससाठी ८ मिनिटे ४ सेकंद, तर धुळे येथे १,७४८ कॉल्ससाठी ८ मिनिटे ११ सेकंद इतका प्रतिसाद वेळ नोंदवला गेला. संपूर्ण परिक्षेत्रात प्राप्त झालेल्या १७,१३९ कॉल्सपैकी जळगावकरांना मिळालेला हा अत्यंत अल्प प्रतिसाद वेळ पोलीस प्रशासनाच्या उत्तम नियोजनबद्धतेची आणि तत्परतेची साक्ष देतो.

या यशामागे पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांचे प्रभावी नियंत्रण, पोलीस कर्मचाऱ्यांचे उच्च प्रशिक्षित मनोधैर्य आणि उपलब्ध तंत्रज्ञानाचा अचूक वापर या त्रिसूत्रीचे मोठे योगदान आहे. आपत्कालीन स्थितीत कॉल्स प्राप्त झाल्यानंतर मागरिट सिस्टीमद्वारे वाहनांची हालचाल कशी असावी, बीट Marshal चे जाळे कसे सक्रिय ठेवावे आणि कर्मचाऱ्यांमध्ये आलेली जबाबदारीची जाणीव या सर्व बाबींमुळे हा अदभुत वेग साध्य झाला आहे. पोलिसांविषयी समाजात अनेकदा अनेक पूर्वग्रह असतात, परंतु जेव्हा संकटसमयी पोलीस अवघ्या सहा मिनिटांत दाराशी उभे ठाकतात, तेव्हा खाकी वर्दीबद्दलचा आदर आणि सुरक्षिततेची भावना द्विगुणित होते. जळगाव पोलिसांनी हीच सर्वसामान्य नागरिकांची भावना वास्तवात आणून दाखवली आहे.

एका बाजूला गुन्हेगारीच्या नवीन आव्हाने आणि दुसऱ्या बाजूला वाढत्या लोकसंख्येचे दडपण असताना, जळगाव पोलीस दलाने दाखवलेली ही गतिशीलता कौतुकास्पद आहे. तंत्रज्ञान आणि मानवी संवेदनशीलता यांची सांगड कशी घालावी, याचे उत्तम उदाहरण या कामगिरीतून मिळते. केवळ आकडेवारीच्या दृष्टीने अव्वल येणे महत्त्वाचे नसून, त्यामागची लोकाभिमुखता आणि संवेदनशील कार्यसंस्कृती अधिक महत्त्वाची ठरते. जळगावच्या या यशामुळे केवळ परिक्षेत्रातच नव्हे तर संपूर्ण राज्य पातळीवर पोलिसांच्या कार्यक्षमतेचा एक नवा मापदंड तयार झाला आहे.

निष्कर्ष काढायचा झाल्यास, श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली जळगाव जिल्हा पोलीस दलाने प्रस्थापित केलेले हे यश इतर जिल्ह्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. आपत्कालीन यंत्रणा जितकी वेगवान तितका गुन्हेगारांचा आत्मविश्वास क्षीण आणि नागरिकांचे जीवन सुरक्षित, हे गणित जळगाव पोलिसांनी अचूक सोडवले आहे. आगामी काळात ही गती अशीच कायम राहिल्यास, कायद्याचा धाक आणि पोलिसांविषयीचा विश्वास या दोन्ही गोष्टी अधिक बळकट होतील. जळगावच्या या शिपाई आणि अधिकाऱ्यांची ही तत्परता म्हणजे लोकशाही मूल्यांची आणि सुरक्षित नागरिकांची खरी पावती आहे.

# पाचोरा इस्कॉन मंदिरात कृष्ण जन्मोत्सव उत्साहात संपन्न

## अडीचशेहून अधिक बालगोपाळांचा राधाकृष्ण फॅन्सी ड्रेस व सांस्कृतिक कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग

**पाचोरा :** येथील इस्कॉन मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त कृष्ण जन्मोत्सव मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात व विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपन्न झाला. सायंकाळी ६ वाजेपासून मध्यरात्री १२ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यास शहरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात भक्तिमय कीर्तन व आरतीने करण्यात आली. त्यानंतर बालगोपाळांसाठी राधाकृष्ण फॅन्सी ड्रेस तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अडीचशेहून अधिक बालगोपाळ व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

बालगोपाळांनी राधाकृष्ण, भगवान श्री जगन्नाथ, श्री बलदेव व माता सुभद्रा यांच्या आकर्षक वेशभूषा साकारत विविध नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. चिमुकल्या बालगोपाळांच्या निरागस अभिनयाने, नृत्याने आणि आकर्षक वेशभूषेने उपस्थित भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.

जन्मोत्सवानिमित्त भगवंतांचा विशेष अभिषेक करण्यात आला. पाचोरा शहरातील विविध व्यापारी, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील भक्तगणांच्या हस्ते हा अभिषेक विधी भक्तिभावाने पार पडला. रात्री बारा वाजता श्रीकृष्ण जन्माचा मुख्य सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी कृष्णनामाचा जयघोष व कीर्तनाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

याप्रसंगी भक्तांसाठी साबुदाणा खिचडी, केळी व राजगिऱ्याचा शिरा आदी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. भाविकांनी मोठ्या संख्येने महाप्रसादाचा





लाभ घेतला.

कार्यक्रमातील बालगोपाळांच्या सहभागाचे विशेष कौतुक करण्यात आले. इस्कॉन मंदिरातर्फे सहभागी सर्व बालगोपाळांचा यथोचित सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले.

इस्कॉन मंदिरातर्फे वर्षभर विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांमागील प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांना व बालगोपाळांना भारतीय संस्कृती, परंपरा, संस्कार आणि अध्यात्माची माहिती मिळावी तसेच आपल्या समृद्ध संस्कृतीची ओळख त्यांना लहानपणापासून व्हावी, हा आहे. आजच्या पिढीला आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवत भविष्यातील पिढी अधिक सुसंस्कृत, संस्कारी व समाजाभिमुख घडावी, हा या उपक्रमांचा मुख्य हेतू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी चैतन्य जीवन प्रभुजी यांनी उपस्थित बालगोपाळ, विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले. भारतीय संस्कृती आणि संस्कारांचे महत्त्व समजावून सांगत बालपणापासूनच मुलांमध्ये चांगले संस्कार रुजविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

धार्मिक उत्सवाला सांस्कृतिक व संस्कारक्षम उपक्रमाची जोड देत आयोजित करण्यात आलेल्या या कृष्ण जन्मोत्सवाला पालक, विद्यार्थी व भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण कार्यक्रमामुळे इस्कॉन मंदिर परिसरात दिवसभर भक्तिमय आणि आनंदमय वातावरण निर्माण झाले होते.

# अंजाळे येथील नूतन विद्या मंदिर हायस्कूलमध्ये गणपती मूर्ती कार्यशाळा व दहीहंडी उत्साहात साजरी

**अंजाळे :** येथील नूतन विद्या मंदिर येथे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, पर्यावरण संवर्धन आणि पारंपरिक सणांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने शाळेत गणपती मूर्ती कार्यशाळा व दहीहंडी उत्सवाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती नीलिमा झोपे यांनी केले. हरितसेना शिक्षक लिलाधर वानखेडे सह जितेंद्र धांडे व सुनील सोनवणे यांच्या सहकार्याने गणपती मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत पर्यावरणपूरक गणपती मूर्ती साकारल्या.




त्यानंतर दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास श्रीमती ज्योती परखड, मनोज चौधरी, पराग चौधरी, यश चौधरी यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांस्कृतिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचा सुंदर संगम असलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सर्वांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# आमडदे येथील सौ. साधनाताई प्रतापराव पाटील विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

**भडगाव :** कर्मवीर तात्यासाहेब हरिरावजी पाटील किसान शिक्षण संस्था, भडगाव संचलित सौ. साधनाताई प्रतापराव पाटील माध्यमिक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, आमडदे येथे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एन. जी. पाटील होते. पर्यवेक्षक वाय. एम. देसले व संजू सूर्यवंशी प्रमुख पाहुणे म्हणून



उपस्थित होते. यावेळी इयत्ता ९ वी ते १२ वीतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेतून दिवसभराचे शालेय कामकाज सांभाळले. इयत्ता १० वीची प्रियंका देसले हिने प्राचार्य, तर इयत्ता ९ वीची इंद्रायणी पाटील हिने पर्यवेक्षकाची भूमिका पार पाडली. एकूण २० विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनाने झाली. त्यानंतर विद्यार्थी-शिक्षकांनी गुलाबपुष्प देऊन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार केला. इयत्ता ५ वी ते ८ वीतील दीपक पाटील, समृद्धी पाटील यांच्यासह अन्य विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच कोमल सूर्यवंशी, जयश्री न्हावी आणि इंद्रायणी पाटील यांनी शिक्षकाची भूमिका निभावताना आलेले अनुभव सांगितले. प्राचार्य एन. जी. पाटील व पर्यवेक्षक वाय. एम. देसले यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कोमल सूर्यवंशी आणि भूमिका जगताप यांनी मानले.

# खानदेशातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते धनाजी रामचंद्र बिऱ्हाडे

## मुंबई इलाख्यातून निवडून आलेले महार समाजातील पहिले सरपंच

**भुसावळ (संघरत्न सपकाळे) :** खानदेशातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा दलित भारत या प्राक्षिकाचे संपादक धनाजी रामचंद्र बिऱ्हाडे बिऱ्हाडे गुरुजी यांचा जन्म असोदा तालुका जिल्हा जळगाव येथे झाला. सातवीपर्यंतचे शिक्षण आसोदा येथे झाले व अध्यापनाचा कोर्स पीडीसी हायस्कूल धुळे येथून केला.

त्यांचे प्राथमिक शिक्षक म्हणून जळगाव जिल्ह्यातील रांजणगाव पिंपळगाव भुसावळ नशिराबाद यावल इत्यादी ठिकाणी नोकरी केली अस्पृश्यतेचे चटके सहन न झाल्यामुळे यावल येथे असताना नोकरीचा राजीनामा दिला व सामाजिक कार्यास सुरुवात केली.

सामाजिक जीवनात धनाजी बिऱ्हाडे यांनी विविध पदे भूषवली आहेत सदस्य जळगाव नगरपालिका सदस्य पूर्व खानदेश डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड आणि विशेष म्हणजे सरपंच असोदा तालुका जळगाव मुंबई इलाख्यातून निवडून आलेले महार समाजातील पहिले सरपंच... सदस्य संत चोखामेळा बोर्डिंग जळगाव अध्यक्ष पूर्व खानदेश जिल्हा प्राथमिक शाळा कामठी संघ.



1937 पूर्व खानदेश विभाग 1951 जळगाव मतदार संघ पराभूत दोन वेळेस विधानसभा निवडणुकीत त्यांनी सहभाग घेतला जळगाव खान्देश मधील सामाजिक कार्यातही त्यांचे मोलाचे योगदान आहे. खानदेशातील आंबेडकरी चळवळ सतत जागृत ठेवण्याचे काम बिऱ्हाडे यांनी केल्याचे दिसून येते अनेक तरुणांना कामासाठी प्रशिक्षकांच्या नोकऱ्या लावून दिल्या जळगाव भुसावळ जामनेर सावदा इत्यादी ठिकाणी अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहात मुलांना शिकण्याची गोडी लागण्यासाठी डिस्ट्रिक लोकल बोर्ड मार्फत विविध प्रोत्साहन पर योजना राबविण्यात त्यांचा मोलाचा सहभाग होता.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा बोर्डाच्या शाळांना दरवर्षी सुट्टी देण्याच्या निर्णयात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. सरपंच पदी असताना अस्पृश्यता कमी करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांची दखल घेऊन सरकारने असोदा ग्रामपंचायत दीड हजार रुपयांचे रोख बक्षीस देऊन आदर्श गाव म्हणून शासनातर्फे गौरव करण्यात आला.

असोदा गावामध्ये सफाई कामगारांना वेतनावर नेमणुका करण्यास सुरुवात केली समता सैनिक दलाच्या सभा अस्पृश्य कामगार संघटना व दलित फेडरेशनच्या बैठकांना वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच गायरान जमिनीवर अस्पृश्यांना घरे बांधायची परवानगी मिळाली त्यांची सरपंच पदाची दैदीप्यमान कारकीर्द आजही तेथील लोकांच्या स्मरणात आहे.

आंबेडकरी चळवळीचे हे लोन महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात येऊन पोहोचले त्यामुळे बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन खानदेशातील हजारो कार्यकर्ते त्यात सहभागी झाले जळगाव जिल्ह्यातील या चळवळीची धुरा बिऱ्हाडे गुरुजी व कर्मवीर सेनू नारायण मेढे यांनी अत्यंत यशस्वीपणे सांभाळली हिंदी इंग्रजी व संस्कृत भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते अस्पृश्यता निवारणासाठी दलित समाजाला सर्वप्रथम शिक्षणाची महती कळणे आवश्यक असल्याने धनाजी बिऱ्हाडे गुरुजी गावोगावी जाऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यायचे.

यांना त्या निमित्ताने खानदेशातील समाजप्रबोधनाचा डंका चौफेर दुमदुमत होता त्याची दखल घेऊन बाबासाहेबांनी आसोदा गावाला भेट दिली बिऱ्हाडे गुरुजी यांच्या घरी मुक्काम केला भेटीत देविदास बुवा या महंतांकडून कबीराचे दोहे ऐकले तसेच धनाजी बिऱ्हाडे यांचे अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य अगदी जवळून पाहिले ते पाहून बाबासाहेबांना खूप आनंद झाला.

बाबासाहेबांच्या निरोपाच्या वेळी वाड्यातील मढी समोर जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते या सभेतील भाषणात बाबासाहेबांनी अस्पृश्यता निवारणाबाबत अतिशय प्रेरणादायी भाषण केले त्यांच्या भाषणात ने उपस्थितांमध्ये कमालीचा उत्साह संचारला आणि त्याचा परिणाम होऊन खानदेशातील सामाजिक चळवळ अधिक गतिमान झाली.




हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक व मालक - **संतोष सुपडू मराठे (मोबा.- 9850251555)** व यांनी **श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स**, पी -33, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -425001 येथे छापून 270,भोईवाडा, शिवसेना कार्यालय जवळ, शिवरायनगर, दुसरा मजला, मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर जि.जळगाव , 425306 (महाराष्ट्र ), येथे प्रसिद्ध केले. * मुख्यसंपादक - संतोष सुपडू मराठे (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) तसेच कार्यकारी संपादक : निलेश मेढे, जाहिरात व्यवस्थापक **सौ. प्रियंका सी. पाटील**, संपादक तथा वितरण व्यवस्थापक **श्री. अमोल सतीश वैद्य (RNI-MHMAR/26/A1057) कार्यालय दूरध्वनी क्र. : 02583-299436, E-Mail : muktaidoot@gmail.com * वेबसाईट : www.muktaidoot.com**

## गो.से.हायस्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा



पाचोरा: पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित, श्री. गो. से. हायस्कूलमध्ये ५ सप्टेंबर रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा झाला. प्रतिमा पूजनाने सुरू झालेल्या या कार्यक्रमात १० वीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून अध्यापन केले. मुख्याध्यापक आर. एल. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात मनोहर देसले यांनी मार्गदर्शन केले, तर अकबर शहा फकीर याने आभार मानले. कु. विधी व मानसी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सौ. श्रद्धा पाटील व श्रीमती प्रज्ञा सावळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी पार पडला.

## मुक्ताईनगर येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा



**मुक्ताईनगर, दि. ५ सप्टेंबर** - विद्या भारती शैक्षणिक मंडळ, अमरावती द्वारा संचलित संत मुक्ताबाई इंग्लिश मीडियम स्कूल, मुक्ताईनगर येथे आज शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधून दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतः शिक्षकांच्या भूमिका साकारल्या. वर्गात शिकवण्यापासून ते शिस्त सांभाळण्यापर्यंत शिक्षकाची



भूमिका निभावत विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. यातून त्यांना शिक्षकांचे कष्ट आणि त्यांचे महत्व अधिक चांगल्या प्रकारे समजले.

हा सर्व कार्यक्रम शाळेतील सर्व शिक्षकांच्या सहकार्याने आणि प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला.

याप्रसंगी प्राचार्य श्री. दीपक पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षणाचे महत्व अधोरेखित करताना विद्यार्थी जीवनात शिक्षकाचे स्थान अनन्यसाधारण असल्याचे सांगितले. शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून तो विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारा शिल्पकार असतो, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाला शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता : कमल विलास लोखंडे



पाचोरा - पाचोरा येथील सामाजिक कार्यकर्ते विलास लोखंडे यांच्या पत्नी कमल विलास लोखंडे (वय - ५२ वर्ष) यांचे अल्पशा आजाराने पुणे येथे उपचारा दरम्यान निधन झाले. त्यांचेवर ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता पाचोरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या पाचोरा नगरपालिकेचे नगरसेवक प्रविण ब्राम्हणे यांच्या भगिनी होत.

## पाचोरा येथे मतीमंद विद्यालयात शिक्षक दिन व गोपाळकाला उत्सव साजरा

पाचोरा : श्री संत गाडगेबाबा शिक्षण संस्था संचलित स्वर्गीय कालिंदीबाई पांडे मतिमंद निवासी विद्यालय, पाचोरा येथे गोपालकाला व शिक्षक दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गोपालकाला कार्यक्रमाचे आयोजन करून विद्यार्थ्यांना प्रसादरूपी खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा आनंद घेतला. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि आनंदाचे वातावरण यामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह प्राप्त झाला.

तसेच शिक्षक दिनानिमित्त डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक करीत असलेल्या कार्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.



दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आनंदासाठी व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेम, आपुलकी आणि प्रोत्साहन मिळते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

गोपालकाला व शिक्षक दिनानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे विद्यालयात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

### जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने 25 शिक्षकांचा

# आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान



**जळगाव :** 5 सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवन येथे दुपारी दोन वाजता जळगाव जिल्ह्यातील ज्यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले अशा 25 शिक्षक बांधवांचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड.अविनाश भालेराव हे होते यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष योगेंद्र पाटील, प्रदेश सरचिटणीस हाजी मुक्ती हारून,प्रदेश सचिव प्रवीण सुरवाडे ,अखिल भारतीय सेवा दलाचे सचिव विनोद कोळपकर, प्रदेश सरचिटणीस ॲड .सलीम पटेल, ओबीसी सेलचे उपाध्यक्ष विजय महाजन, प्राचार्य एस एस राणे ,माजी शहर जिल्हाध्यक्ष श्याम तायडे, काँग्रेस उपाध्यक्ष अशोक खलाणे, धनगर अण्णा पाटील, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष किरण महाजन, जिल्हा उपाध्यक्ष विजयकुमार कोसोदे जिल्हा खजिनदार राहुल बाहेती ,ज्येष्ठ नेते श्रीधर चौधरी ,विजय वाणी, एससी सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड अंकुश कटारे ,हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते यावेळी प्रमुख पाहुण्यांनी शिक्षकांच्या शिक्षणाच्या योगदानासंदर्भात व त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव आपल्या मनोगत व्यक्त केला यावेळी मोठ्या संख्येने नागरिक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. या आदर्श शिक्षकांचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यात श्रीमती रूपाली पाटील पाचोरा, श्रीमती सुनिता पाटील जळगाव, श्रीमती रूपाली देवरे जळगाव, श्रीमती डॉक्टर अर्चना सूर्यवंशी जळगाव , श्रीमती अनिता सतीश पाटील जळगाव, प्राध्यापक सागर सोनवणे जळगाव, प्रसन्न रमेश खंडाळे चाळीसगाव, भटू आव्हाळे एरंडोल ,राजेंद्र मधुकरराव देशमुख अमळनेर, प्रमोद धर्मराज पाटील धरणगाव, हिलाल पुंडलिक पाटील अमळनेर, विनोद प्रकाश पाटील चोपडा, दीपक हरी सोनार चोपडा, प्राध्यापक वासुदेव पाटील जळगाव, गजानन अशोक सुरवाडे भुसावळ, मोहसीन खान अजित खान जळगाव,अशोक सोनू पार्टी जळगाव, मनोहर भजनलाल तेजवानी जळगाव, डॉक्टर संजय कुमार सोनवणे धरणगाव, सुनील भिवा जाधव पारोळा ,प्राध्यापक इक्बाल मिर्झा जळगाव ,श्री नरेंद्र भोई जळगाव, भिका सोमा सपकाळे आवार तालुका जळगाव , दिनेश नवल चव्हाण, एरंडोल यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक प्रवीण पाटील सर यांनी केले सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस बाबा देशमुख यांनी केले आभार प्रदर्शन प्रदीप सोनवणे यांनी मानले यावेळी कार्यक्रमाला दीपक सोनवणे युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पटेल ,अध्यक्ष कौस्तुभ पाटील, जाकीर बागवान अर्चना गाडे ,छाया कोरडे लीला सोनवणे ,प्रभाकर महाजन , राजू भोसले यांच्यासह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित होते

## विद्यार्थ्यांनी साकारल्या शिक्षकांच्या भूमिका

### स्व.निखिलभाऊ खडसे विद्यालयात उत्साहात शिक्षक दिन साजरा

मुक्ताईनगर : स्वर्गीय निखिल भाऊ खडसे सेमी इंग्लिश मीडियम स्कूल, मुक्ताईनगर येथे शिक्षक दिनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदमय आणि शैक्षणिक वातावरणात उत्साहात संपन्न झाला. इयत्ता पहिलीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध भूमिका साकारल्या. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत येत शाळेचे दैनंदिन कामकाज सांभाळले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे महत्त्व, शिक्षणाचे मूल्य आणि गुरू-शिष्य नात्याचे महत्त्व यावर मनोगते व भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांच्या या अनोख्या भूमिकांमुळे संपूर्ण शाळेचे वातावरण आनंद, उत्साह आणि उत्स्फूर्ततेने भारून गेले. या उपक्रमात मुख्याध्यापकपदाची भूमिका ममता सतीश सावळे, तर उपमुख्याध्यापकपदाची भूमिका गुंजन निलेश भालेराव यांनी प्रभावीपणे पार पाडली. विद्यार्थ्यांनी जबाबदारीने पार पाडलेल्या



या भूमिका सर्वांसाठी विशेष आकर्षण ठरल्या. कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य श्री. व्ही. के. वडसकर सर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षकाचे जीवनातील स्थान, शिक्षकांचे योगदान आणि गुरूंच्या मार्गदर्शनाचे महत्त्व याविषयी अनमोल मार्गदर्शन केले. तसेच शाळेतील शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे इंग्लिश डिपार्टमेंट हेड श्री. सतीश गायकवाड यांनी प्रभावीपणे केले, तर कार्यक्रमाच्या आयोजनाला व शिस्तबद्ध नियोजनाला पर्यवेक्षक श्री.स्वप्नील चौधरी सर यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारत अनुभवलेले नेतृत्व, जबाबदारी आणि अध्यापनाचे महत्त्व हा शिक्षक दिनाचा विशेष ठरला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आनंदमय वातावरण यामुळे स्वर्गीय निखिल भाऊ खडसे सेमी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिक्षक दिनाचा सोहळा अविस्मरणीय ठरला.

## शाळेच्या वर्गखोलीत शिरला साप



नाडगाव : येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या वर्गखोलीत धामण जातीचा बिनविषारी साप शिरला. दहीहंडीच्या कार्यक्रमामुळे विद्यार्थी दुसऱ्या वर्गात असल्याने मोठा अनर्थ टळला. पोषण आहार शिजवणाऱ्या महिला कर्मचाऱ्याच्या सतर्कतेनंतर शिरसाळा येथील सर्पमित्र समाधान गोसावी यांनी अवघ्या २० मिनिटांत पोहोचून सापाला सुरक्षितपणे रेस्क्यू केले.

### भडगावात संशयास्पद फोर्टिफाइड तांदळाचा आयशर ट्रक जप्त;

## तब्बल १५० क्विंटल तांदूळ ताब्यात

भडगाव शहरात संशयास्पद स्वरूपात वाहतूक होणारा १५० क्विंटल (३०० गोण्या) फोर्टिफाइड तांदूळ तहसील प्रशासनाने जप्त केला आहे. २ सप्टेंबर २०२६ रोजी चाळीसगावहून पाचोऱ्याकडे जाणाऱ्या एका आयशर ट्रकमधून (MH-52-0138) या तांदळाची वाहतूक केली जात होती.



संशय आल्याने पत्रकारांनी पाठलाग करून ट्रक थांबवला व महसूल विभागाला माहिती दिली. जप्त गोण्यांवर 'खुल्या बाजारात विक्रीसाठी नाही' असा स्पष्ट उल्लेख असून FSSAI क्रमांकही छापलेला आहे. चालकाकडील बिलांनुसार माल चोपडा येथून वरखेडी (ता. पाचोरा) येथे जात असल्याचे दर्शवले असले तरी, मालाचा मूळ स्रोत, बिलांची सत्यता आणि वाहतुकीची परवानगी याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्रशासनाने नमुने प्रयोगशाळेत पाठवले असून पुढील चौकशी सुरू आहे.

## मुक्ताईनगर तालुक्यात सरपंच पदांच्या आरक्षणाची सोडत 7 व 8 सप्टेंबरला

मुक्ताईनगर, दि. ४ सप्टेंबर २०२६ : महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या निर्देशानुसार तसेच जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या आदेशान्वये मुक्ताईनगर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) व सर्वसाधारण प्रवर्गाचे आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासोबतच संबंधित महिला प्रवर्गासाठीही आरक्षण निश्चित केले जाणार आहे. ओबीसी व सर्वसाधारण प्रवर्गासाठी ७ सप्टेंबरला सोडत मुक्ताईनगर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांचे नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षण सोडत पद्धतीने निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, मुक्ताईनगर येथील सभागृहात तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली



आरक्षण सोडत सभा आयोजित करण्यात आली आहे. महिला आरक्षणाची सोडत ८ सप्टेंबरला ७ सप्टेंबर रोजी ओबीसी व सर्वसाधारण प्रवर्गासाठी सरपंच पदांचे आरक्षण निश्चित झाल्यानंतर, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला यांच्यासाठी सरपंच पदांचे आरक्षण सोडत पद्धतीने निश्चित करण्यात येणार आहे. त्यासाठी ८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, मुक्ताईनगर येथील सभागृहात उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत सभा होणार आहे. या दोन्ही आरक्षण सोडत सभांना मुक्ताईनगर तालुक्यातील ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, सभासद, इच्छुक नागरिक तसेच ग्रामस्थांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार गिरीश वखारे यांनी केले आहे. आरक्षण सोडतीमुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांचे लक्ष आता ७ व ८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सोडतीकडे लागले आहे.

# शहाद्यात मोकाट गुरांचा विळखा; अपघाताची वाट पाहतेय का पालिका?

## मुख्य रस्ते, बाजारपेठेत वाहतूक विस्कळीत; दुचाकीस्वार, पादचारी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**शहादा :** शहादा शहरातील मोकाट गुरांचा प्रश्न आता गंभीर वळणावर पोहोचला असून, नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि बाजारपेठेत दिवसभर मोठ्या संख्येने गुरे मोकाट फिरताना तर अनेक ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी ठाण मांडून बसलेली दिसत आहेत. त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असून, वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच नगरपालिका प्रशासनाने तातडीने ठोस कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शहरवासीयांनी केली आहे.

शहरातील मुख्य रस्त्यांवर सकाळपासून रात्रीपर्यंत वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र, त्याच मार्गांवर मोकाट गुरांचे कळप फिरत असल्याने वाहतूक वारंवार विस्कळीत होते. अनेकदा गुरे अचानक वाहनांसमोर येत असल्याने दुचाकीस्वारांना तातडीने ब्रेक लावावे लागतात. अशा वेळी मागून येणाऱ्या वाहनांच्या धडकेची शक्यता वाढत असून, अपघाताचा धोका कायम निर्माण होत आहे.

### बाजारपेठेत नागरिकांची मोठी कोंडी

शहरातील मुख्य बाजारपेठ, प्रमुख चौक आणि वर्दळीच्या भागात मोकाट गुरांचा वावर अधिक असल्याचे चित्र आहे. रस्त्याच्या मधोमध बसलेल्या गुरांमुळे वाहनांना वळसा घालून पुढे जावे लागत असल्याने वाहतुकीचा वेग मंदावतो. विशेषतः पादचारी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि शाळकरी विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे.

रात्रीच्या वेळी रस्त्यावर बसलेली गुरे वाहनचालकांच्या नजरेस उशिरा पडत असल्याने अपघाताचा धोका आणखी वाढत असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### नागरिकांचा संताप; कायमस्वरूपी उपाययोजना कुठे?

मोकाट गुरांचा प्रश्न अनेक दिवसांपासून कायम असतानाही त्यावर प्रभावी उपाययोजना झालेली नसल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा त्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी मांडले.

रस्त्यावर जनावरे मोकाट सोडणाऱ्या पशुपालकांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.

### पालिकेने विशेष मोहीम राबवावी

नगरपालिका प्रशासनाने शहरातील प्रमुख रस्ते आणि बाजारपेठ परिसरात विशेष मोहीम हाती घेऊन मोकाट गुरांचा बंदोबस्त करावा, गुरे पकडण्यासाठी स्वतंत्र पथक नियुक्त करावे आणि संबंधित पशुपालकांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी शहरवासीयांनी केली आहे.

प्रशासन आणि पशुपालक यांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघू शकतो. मात्र, तोपर्यंत शहाद्यातील रस्त्यांवर मोकाट गुरांचा वाढता वावर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी मोठे आव्हान ठरत असल्याचे चित्र आहे.

### नागरिकांच्या प्रमुख मागण्या

शहरातील मोकाट गुरांविरोधात तातडीने विशेष मोहीम राबवावी.
गुरे पकडण्यासाठी स्वतंत्र पथक कार्यरत करावे.
मोकाट जनावरे सोडणाऱ्या पशुपालकांवर दंडात्मक कारवाई करावी.
प्रमुख रस्ते व बाजारपेठ परिसर नियमितपणे मोकळा ठेवावा.
अपघात टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना तातडीने अमलात आणाव्यात.



# मैत्रिणीसोबतच्या वादानंतर पुण्यातील तरुणाचा गोव्यात मृत्यू

**पुणे :** उत्तर गोव्यातील सिओलिम येथील राई गावात पुण्यातील २६ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रोहित जळगावकर असे मृत तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी मैत्रिणीसोबत झालेल्या वादानंतर त्याने स्वतःला चाकूने दुखापत केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे.

रोहित हा गोव्यातील भाड्याच्या घरातून 'वर्क फ्रॉम होम' करत होता. हैदराबाद येथे राहणाऱ्या मैत्रिणीसोबत वाद झाल्यानंतर त्याने स्वयंपाकघरातील चाकूने स्वतःला दुखापत केल्याचे सांगण्यात येत आहे. त्याच्या मदतीच्या हाका ऐकून घरमालक व शेजारी घटनास्थळी धावून आले. त्यांनी रोहितला सिओलिम येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुरावे गोळा केले. मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी मृतदेह गोवा मेडिकल कॉलेज, बांबोळी येथे शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. दरम्यान, घटनेची चौकशी करण्यासाठी पोलिसांनी रोहितच्या मैत्रिणीला ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे.

# कलेक्शन एजंटला रस्त्यात अडवून लुटले; शहादा पोलिसांची 'तीन तासांत' कारवाई!

## मारहाण करून ₹१६ हजार १९५ रोकड व मोबाईल लुटला; तिन्ही संशयित जेरबंद, ₹३५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**शहादा :** कलेक्शन एजंटला रस्त्यात अडवून मारहाण करत त्याच्याकडील रोकड व मोबाईल लुटून पसार झालेल्या तीन संशयित आरोपींना शहादा पोलिसांनी अवघ्या तीन तासांत जेरबंद केले. या कारवाईत पोलिसांनी १६ हजार १९५ रुपये रोख, २० हजार रुपये किमतीचा मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहादा पोलिस ठाण्याच्या हद्दीत २ सप्टेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास शिरूड दिगर ते मनरद रस्त्यावर ही घटना घडली. कलेक्शन एजंट दिपक भरत भिल हे वसुली करून जात असताना तीन अज्ञात इसमांनी त्यांना रस्त्यात अडविले. त्यानंतर आरोपींनी त्यांना मारहाण करून त्यांच्या ताब्यातील १६ हजार १९५ रुपये रोख आणि सुमारे २० हजार रुपये किमतीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला व घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच शहादा पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरविली. पोलिस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांनी गुन्हा शोध पथकाला मार्गदर्शन करून संशयितांचा शोध घेण्यासाठी तात्काळ नाकाबंदी करण्यासह विविध ठिकाणी कसून तपास करण्याचे आदेश दिले.

पोलिसांनी उपलब्ध माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा माग काढण्यास सुरुवात केली. तपासात संशयित म्हणून रविंद्र भगवान माळी, अजय संजय भिल आणि नवनाथ नरोत्तम भिल, तिघेही रा. मनरद, ता. शहादा यांची नावे समोर आली. पोलिस पथकाने तत्परतेने कारवाई करीत घटनेनंतर अवघ्या तीन तासांत तिन्ही संशयितांना ताब्यात घेतले.

पोलिस चौकशीत संशयितांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे समोर आले. त्यांच्या ताब्यातून फिर्यादीकडून लुटलेली १६ हजार १९५ रुपयांची रोकड आणि २० हजार रुपये किमतीचा मोबाईल, असा एकूण ३५ हजार १९५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच रस्तालुटीसाठी वापरण्यात आलेली मोटारसायकलही पोलिसांनी जप्त केली.

तिन्ही संशयितांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शहादा पोलिसांकडून सुरू आहे.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई पोलिस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलिस अधीक्षक अशित कांबळे आणि शहादा उपविभागीय पोलिस अधिकारी गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिस निरीक्षक हेमंतकुमार पाटील, पोलिस उपनिरीक्षक प्रदीपसिंग राजपूत, सहायक पोलिस निरीक्षक चंद्रशेखर देसले, पोलीस हवालदार दीपक चौधरी, देविदास विसपुते, राजू चव्हाण, पोलीस कॉन्स्टेबल कपिल मंदील , भरत शिंपी, भगवान सावळे आणि पोलीस गोरख चौधरी यांच्या पथकाने या कारवाईत सहभाग घेतला.

रस्त्यात अडवून मारहाण करून लूट करणाऱ्या आरोपींचा अवघ्या तीन तासांत शोध घेऊन त्यांना जेरबंद करण्यासह लुटीचा मुद्देमाल हस्तगत केल्याने शहादा पोलिसांच्या तत्पर व प्रभावी तपासाचे कौतुक होत आहे.

# नाहाटा महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त प्राध्यापकांचा गुणगौरव समारंभ संपन्न

**भुसावळ :** नाहाटा महाविद्यालयामध्ये दिनांक 5 सप्टेंबर 2026 रोजी स्टाफ अकॅडमी आणि स्टाफ अँड स्टूडेंट्स वेल्फेअर कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गुण गौरव समारंभ पार पडला .

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा डॉ. मोहन भाऊ फालक, चेअरमन श्री महेश भाऊ फालक, कोषाध्यक्ष मा श्री संजयकुमारजी नाहाटा, प्राचार्य डॉ बी एच बऱ्हाटे , उपप्राचार्य डॉ.दीपक पाटील, उपप्राचार्य डॉ. जी आर वाणी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. वाय. एम.पाटील



इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते .

याप्रसंगी महाविद्यालयातील मागील वर्षात पीएच.डी, नेट - सेट, पेटंट व आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील जर्नल मध्ये प्रकाशित शोधनिबंध प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संचालक मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. 5 सप्टेंबर हा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणून साजरा केला जातो.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. रश्मी शर्मा यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनावर आणि आजच्या आधुनिक युगात शिक्षण क्षेत्रात होणारे बदल यावर सखोल असे मार्गदर्शन केले तसेच त्यांनी काव्याच्या माध्यमातून शिक्षक कसा असावा यावर भाष्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्टाफ अकॅडमी समिती प्रमुख प्रा. डॉ. एस.टी. धूम यांनी केले. सूत्रसंचालन पी.ए. अहिरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. प्रफुल्ल इंगोले यांनी केले. गुणगौरव यादी वाचन डॉ मनोज कुमार जाधव, डॉ.ममता पाटील यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन प्रबंधक श्री. भगवान तायडे व कार्यालयीन अधीक्षक श्री. सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्टाफ अकॅडमी आणि स्टाफ अँड स्टूडेंट वेल्फेअर समितीच्या डॉ एस. के राठोड, डॉ. सचिन येवले, डॉ. गौरी पाटील, डॉ. जितेंद्र आडोकार, प्रा.सुनील अडकमोल, डॉ.किरण वारके परिश्रम घेतले.

# वेलीमाता आश्रमशाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा

**शहादा :** वेली. ता. अक्कलकुवा जि.नंदूरबार येथील वेलीमाता प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक आश्रमशाळा,वेली येथे भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी मनोगते व्यक्त करून शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत सहभागी होत अध्यापनाचा अनुभव घेतला. आजच्या दिवशी शाळेच्या मुख्याध्यापकांची भूमिका इयत्ता अकरावी विज्ञानची विद्यार्थिनी चांदणी देवजी तडवी तर उपमुख्याध्यापकाची भूमिका स्नेहल तिज्या पाडवी या विद्यार्थिनीने बजावली.

शाळेतील शिपायाची भूमिका विकास साखऱ्या तडवी व महेंद्र वीरसिंग वसावे या विद्यार्थ्यांनी पार पाडली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिक्षकांचे समाज घडविण्यातील योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील शिक्षकांची भूमिका आणि शिक्षणाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना शुभेच्छा देऊन कृतज्ञता व्यक्त केली.शिक्षकांमधून यशवंत वसावे,दिनेश विसपुते,क्रिष्णा पावरा,श्रीमती मनिषा नगराळे यांनी शिक्षक दिनाबद्दल आपले मार्गदर्शन पर मनोगत व्यक्त केले. तसेच माध्यमिक मुख्याध्याक संदीप पवार प्राथमिक मुख्याध्यापक नितिन पाटील यांनी सर्वांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साक्षी रविंद्र वळवी (९ वी ) या विद्यार्थिनीने अतिशय सुंदर पद्धतीने केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार अल्का सायसिंग वसावे यांनी मानले.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# रक्षाताई खडसेंच्या हस्ते रावेर मतदारसंघात ₹७१.१९ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**रावेर :** रावेर लोकसभा मतदारसंघातील पायाभूत सुविधांच्या विकासाला मोठी चालना देणाऱ्या ₹७१.१९ कोटींच्या चार महत्त्वपूर्ण विकासकामांचे भूमिपूजन केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे यांच्या हस्ते करण्यात आले. या विकासकामांमध्ये रावेर, यावल आणि फैजपूर-सावदा शहरांतील राष्ट्रीय महामार्गाला समांतर मार्गांचा विकास तसेच फैजपूर येथील नवीन उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या इमारतीचा समावेश आहे.

बुऱ्हाणपूर-अंकलेश्वर चारपदरी राष्ट्रीय महामार्गामुळे रावेर, यावल, फैजपूर आणि सावदा शहरांना बायपास मार्ग उपलब्ध होत असताना शहरांतील स्थानिक वाहतूक सुरळीत राहावी, व्यापारी हालचालींना अडथळा निर्माण होऊ नये आणि नागरिकांची गैरसोय टळावी, यासाठी समांतर मार्ग विकसित करण्याचा प्रस्ताव रक्षाताई खडसे यांनी




केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून मंजूर करून घेतला.

याशिवाय, फैजपूर (यावल) येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या नवीन इमारतीसाठी ₹६.५१ कोटींचा निधी मंजूर असून, या इमारतीमुळे नागरिकांना अधिक सुसज्ज प्रशासकीय सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या सर्व विकासकामांमुळे शहरांतील वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होण्याबरोबरच स्थानिक व्यापार, दळणवळण आणि परिसराच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमास विधानपरिषद सदस्य नंदकिशोर महाजन, स्थानिक लोकप्रतिनिधी, नगराध्यक्ष, नगरसेवक तसेच भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मंजूर विकासकामे

यावल शहर समांतर मार्ग (६.५ किमी) – ₹१४.५९ कोटी
फैजपूर-सावदा समांतर मार्ग (१४.२३ किमी) – ₹२७.९९ कोटी
रावेर ते महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमा समांतर मार्ग (११.१० किमी) – ₹२२.१० कोटी
या तीन मार्गांसाठी ₹६४.६८ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

# बारामतीत अडीच कोटींचा गांजा; विकी कांबळे जेरबंद

**बारामती :** जळोची-पिंपळी रोड परिसरातील निर्जन शेतात सापडलेल्या ४७८ किलो ९५० ग्रॅम गांजा प्रकरणात बारामती शहर पोलिसांनी विकी विजय कांबळे याला अटक केली. न्यायालयाने त्याला ७ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.



२८ फेब्रुवारी रोजी दोन प्लास्टिक ड्रममध्ये ४६५ पॅकेट्समधून हा गांजा आढळला होता. पोलिसांनी सुमारे २ कोटी ३९ लाख ४९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला होता. सहा महिन्यांच्या तांत्रिक तपासानंतर कांबळे पोलिसांच्या जाळ्यात सापडला.

या प्रकरणाचे धागेदोरे ओडिशापर्यंत पोहोचले असून गांजाचा पुरवठा, वाहतूक आणि वितरण साखळीचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.